आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२६ ऑगस्ट २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- भारत आणि सिंगापूर यांच्यातल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेला आज सिंगापूरमध्ये सुरुवात होणार

- देशभरात गोकुळाष्टमीचा उत्साह; राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांकडून श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या देशवासियांना शुभेच्छा

- भारत आणि श्रीलंका यांच्यातल्या संयुक्त सैन्य अभ्यासासाठी भारतीय नौदलाची आयएनएस मुंबई युद्धनौका कोलंबोत दाखल

**आणि**

- वर्षातली शेवटची टेनिस ग्रँडस्लॅम यूएस खुली स्पर्धा आजपासून न्यूयॉर्कमध्ये सुरू होणार

**<><><><><>**

भारत आणि सिंगापूर यांच्यातली दुसरी गोलमेज परिषद आज सिंगापूर मध्ये होत आहे. या परिषदेसाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांच्यासह वाणिज्य मंत्री पियूष गोयल, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्वीनी वैष्णव उपस्थित राहणार आहेत. सर्व मंत्रिगण सिंगापूरच्या मंत्र्यांबरोबर आणि नेत्यांबरोबर  दोन्ही देशामधील परस्पर सहकार्याबाबत चर्चा करतील. दोन्ही देशातील परस्पर सहकार्य वाढीसाठी यावेळी चर्चा होणार आहे. सिंगापूरमधून भारतात मोठ्या प्रमाणात थेट परकीय गुंतवणूक येत असते. गेल्या आर्थिक वर्षात सिंगापूरमधून भारतीय बाजारात ११ अब्ज अमेरिकन डॉलरहून अधिक गुंतवणूक करण्यात आली होती. आज सकाळी अर्थ मंत्री निर्मला सीतारमन यांनी सिंगापूरमध्ये आर्थिक कार्य कृतीदलाचे माजी अध्यक्ष टी. राजा कुमार यांची

भेट घेतली. आपला अध्यक्षीय कार्यकाळ यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांनी राजा यांचं अभिनंदन केलं.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल अमेरिकेतल्या राष्ट्रीय नागरी हक्क संग्रहालयाला भेट दिली आणि टेनेसी मधल्या मेम्फिस इथं भारतीय समुदायाशी संवाद साधला. राजनाथ सिंह यांचा अमेरिका दौऱ्याचा काल शेवटचा दिवस होता. मेम्फिस, अटलांटा आणि नॅशव्हिल इथल्या भारतीय समुदायाबरोबर संवाद साधताना सिंग यांनी भारतीय समुदायाच्या समाज, विज्ञान आणि अर्थव्यवस्थेतल्या योगदानाचं कौतुक केलं. हे राष्ट्रीय नागरी हक्क संग्रहालय १७ व्या शतकातलं अमेरिकेच्या नागरी हक्क चळवळीचा इतिहास सांगणारं असून या ठिकाणी महात्मा गांधींचा एक अर्धपुतळा सुद्धा आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानेज यांच्याशी संवाद साधला. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातले संबंध आणि सहकार्य, तसंच क्वाडबद्दल यावेळी चर्चा झाल्याची माहिती प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली आहे.

<><><><><>

ब्राझीलचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मौरो वीईरा यांचं चार दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी काल नवी दिल्लीत आगमन झालं. वीईरा यांच्या भेटीमुळे भारत आणि ब्राझील यांच्या दरम्यान धोरणात्मक भागीदारीला चालना मिळेल, असं भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि मौरो वीईरा उद्या होणाऱ्या नवव्या भारत-ब्राझील कमिशनच्या बैठकीचं अध्यक्षस्थान संयुक्तपणे भुषवतील. यावर्षीचं जी २० चं अध्यक्षस्थान ब्राझीलकडे

आहे, या परिषदेतून चांगले परिणाम उपजावेत यासाठी दोन्ही देश चर्चा करणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

लडाख या केंद्रशासीत प्रदेशात पाच नवे जिल्हे तयार करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज ही माहिती दिली. नव्या रचनेनुसार लडखमध्ये जास्कर, द्रास, शाम, नुब्रा आणि चांगथांग हे पाच जिल्हे तयार केले जाणार आहेत.

<><><><><>

भगवद्गीतेतून विश्वाचं ज्ञान दिलेल्या श्रीकृष्णाचा जन्मसोहळा म्हणजेच गोकुळाष्टमी आज देशभरात मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावानं साजरी होत आहे. मथुरेतील श्रीकृष्ण जन्मस्थळीच्या मंदिरात आज पहाटेपासूनच भाविकांनी मोठी गर्दी केली होती. आज मध्यरात्री हा सोहळा रंगणार आहे. मथुरेसह देशभरातल्या सर्वच मंदिरांमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मथुरेबरोबरच वृंदावन इथल्या जन्माष्टमी सोहळ्यालाही विशेष महत्त्व आहे. महाराष्ट्रातल्या विविध मंदिरांमध्ये विशेष पूजा अर्चा आणि श्रीकृष्ण जन्माष्टमीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. श्रीकृष्णाची मुर्ती पाळण्यात बसवून हा सोहळा साजरा करण्याची प्रथा असून उद्या मुंबईसह विविध ठिकाणी गोविंदा पथके गल्लोगल्ली उभारलेल्या दहीहंड्या फोडण्यासाठी बाहेर पडतील. जन्माष्टमी निमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

भारत आणि श्रीलंका यांच्यातील संयुक्त सैन्य अभ्यासासाठी भारतीय नौदलाची आयएनएस मुंबई ही युद्धनौका आज कोलंबोत पोहोचली. श्रीलंकेच्या नौदलाने या युद्धनौकेचं उत्साहात स्वागत केलं. आयएनएस मुंबई या युद्धनौकेची या वर्षातील ही पहिली श्रीलंका भेट असून भारतीय नौदलाच्या जहाजाची ही आठवी श्रीलंका यात्रा

आहे. आपल्या तीन दिवसांच्या या दौऱ्यात आयएनएस मुंबई भारतीय नौसेनेद्वारे संचलित करण्यात येत असलेल्या डॉनिअर जातीच्या विमानांचे सुटे भाग पुरवणार असून ते श्रीलंकेच्या नौ◌ैदल अधिकाऱ्यांना प्रशिक्षणही देणार आहेत. या निमित्ताने भारत आणि श्रीलंका नौदलाचे काही संयुक्त कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.

**<><><><>**

आर्थिक व्यवहारांसाठी उपयोगी असणाऱ्या GEM, UPI आणि ULI या तीन पद्धतींमुळे डिजिटल व्यवहारांमध्ये भारतानं क्रांतिकारी पाऊल टाकल्याचं प्रतिपादन रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज केलं. रिझर्व बँकेच्या नव्वदाव्या वर्षानिमित्त सुरू असलेल्या उपक्रमाचा भाग म्हणून बेंगळुरू इथं डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर आणि इमर्जिंग टेक्नोलॉजीची जागतिक परिषद आयोजित करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी डिजिटल आर्थिक व्यवहारांमध्ये सुलभता आणणाऱ्या यूपीआय पद्धतीचं कौतुक केलं. तसंच, आता रिझर्व बँक त्याच्या पुढे एक पाऊल जात असून लवकरच कर्ज व्यवहारांसाठी यूएलआय नावाची नवीन पद्धत सुरू करण्यात येईल. त्यामुळे कर्जसंबंधित व्यवहारही सुलभ होतील, असंही दास यावेळी म्हणाले.

**<><><><>**

बांगला देशातील निवडणुकांचा निर्णय हा राजकीय स्थिती आणि बांगला देशच्या नागरिकांच्या मतानुसार घेतला जाईल, असं बांगला देशातल्या हंगामी सरकारचे प्रमुख मुहम्मद युनुस यांनी म्हटलं आहे. हे हंगामी सरकार किती दिवस चालेल हेही बांगला देशाच्या नागरिकांच्या मनावरच असल्याचं त्यांनी काल देशाला उद्धेशून केलेल्या संदेशात म्हटलं आहे. देशातील प्रशासन, न्यायव्यवस्था आणि निवडणूक आयोगामधील आवश्यक फेरबदल झाल्यानंतर निर्भय वातावरणात मुक्त निवडणुका

घेतल्या जातील, असंही त्यांनी सांगितलं. देशात भ्रष्टाचार, लूट आणि हिंसाचाराचा विरोध करणारं सरकार यावं हे या निवडणुकाचं उद्दीष्ट असल्याचही ते म्हणाले.

<><><><><>

वर्षातली शेवटची टेनिस ग्रँडस्लॅम यूएस खुली अजिंक्यपद स्पर्धा आजपासून न्यूयॉर्कमध्ये सुरू होणार आहे. भारताचा सुमित नागल आणि रोहन बोपण्णा हे दोघे स्पर्धेत उतरतील. एकाच वर्षात चारही ग्रँडस्लॅम स्पर्धांच्या एकेरीत खेळणारा सुमीत नागल २०१९ नंतरचा पहिला भारतीय पुरुष टेनिसपटू ठरला आहे. सध्या तो जागतिक क्रमवारीत ७२व्या स्थानावर आहे. दोनवेळा ग्रँडस्लॅम अजिंक्यपद पटकावणारा रोहन बोपण्णा त्याचा जोडीदार मॅथ्यू एब्देन याच्यासोबत पुरुष दुहेरीत खेळणार आहे. याशिवाय, पुरुष एकेरीत गतविजेता नोव्हाक जोकोविच, फ्रेंच आणि विम्बल्डन अजिंक्यपद विजेता कार्लोस अल्काराज, तसंच अग्रमानांकित यानिक सिनर यांच्यावर टेनिसपटूंचं लक्ष असेल. तर महिला एकेरीत गतविजेती कोको गॉफ, माजी विजेती इगा श्वियांतेक, एलेना रिबाकीना आणि अरीना साबालेंका या चौघी जेतेपदाच्या प्रबळ दावेदार असतील.

<><><><><>

मालदीवच्या थुलुसधू इथं झालेल्या आशियाई सर्फिंग अजिंक्यपद २०२४ स्पर्धेच्या अंतिम फेरीत मारुहाबा कप या सांघिक स्पर्धेत भारतानं आज रौप्य पदक जिंकलं. या स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकून जपान ५८ पूर्णांक ४० गुणांसह प्रथम स्थानी आहे, तर भारत २४ पूर्णांक १३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. तैपेई २३ पूर्णांक ९३ गुणांसह तिसऱ्या, तर चीन २२ पूर्णांक १० गुणांसह चौथ्या स्थानावर आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार वसंतराव चव्हाण यांचं आज पहाटे निधन झालं. ते ७० वर्षांचे होते. गेल्या काही

दिवसांपासून त्यांच्यावर हैद्राबादमधल्या रुग्णालयात उपचार सुरू होते. अखेर आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. उद्या सकाळी अकरा वाजता नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव इथं त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सरपंच, विधानपरिषद, विधानसभेचे सदस्य ते लोकसभेचे खासदार असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. याशिवाय शिक्षण, सहकार आणि कृषी क्षेत्रात त्यांनी महत्वाचं योगदान दिलं आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी चव्हाण यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे काँग्रेसने लढवय्या कार्यकर्ता आणि लोकप्रतिनिधी गमावल्याची भावना खरगे यांनी व्यक्त केली. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि भाजपा खासदार अशोक चव्हाण यांनीही वसंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं पुढील तीन दिवसांत  महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात,आणि गोव्यात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. मध्य प्रदेशच्या वायव्य भागात आणि  राजस्थानच्या पूर्व भागात  कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून आज मध्य प्रदेशात मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसंच पुढील तीन दिवसांत पूर्व आणि दक्षिण राजस्थान, गुजरात, सौराष्ट्र आणि कच्छमध्येही हीच परिस्थिती राहण्याचा अंदाज आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, ओडिशा, पश्चिम बंगालमधल्या गंगेच्या खोऱ्यात, तसंच  झारखंडमध्येही पुढील दोन दिवसांत मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. येत्या ३० ऑगस्टपर्यंत गुजरात आणि उत्तर महाराष्ट्राच्या किनाऱ्यालगतचा समुद्र खवळलेला असेल, त्यामुळे अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागर, विशेषत: गुजरात आणि महाराष्ट्राच्या किनारपट्टीच्या भागात  मच्छिमारांनी जाऊ नये  असा  सल्ला भारतीय हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><><>//**